Vol II Issue X Nov 2012

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 10, Nov. 2012
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या वाटचालीचे सिंहावलोकन

**चौधरी आर.एम.**

प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग,
श्रीमती सुशिलादेवी देशमुख महिला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर.

***सारांश :***

मनुष्य हा स्वभावतः समाजशील प्राणी आहे समाजाशिवाय त्याला जगता येत नाही अन्न वस्त्र निवारा इ. प्राथमिक गरजा भागवताचा देखिल त्याला समाजावर अवलूंन रहावे लागते. एकमेकांच्या सहायाशिवाय मानव जीवन उत्कर्षप्रत जात नाही म्हणून "एकमेंका सहाय् करू अवघे धरू सुपंथ" या उक्तीप्रमाणे प्राचिन काळापासून सहकाराला सुरूवात झालेली दिसुन येते अगदी मानवी इतिहासाइतकेच ते पुरातन आणि चिरंतन सत्य आहे त्यामुळे प्राणी मात्रांच्या अस्तित्वाबरोबरच पशूही त्याच तत्वाने वावरताना दिसतात त्यामुळे अगदी सृष्टीच्या उगमापासून मानवी समुह निर्मीती बरोबरच सहकाराचा उगम झालेला दिसून येतो.

***प्रस्तावनाः***

जगात 18 व्या शतकात आधुनिक सहकाराचा उगम इंग्लंडमध्ये 160 वर्षापुर्वी झाला 1844 साली रॉशडेल पायोनिअर्सने सहकारी चळवळीचा पाया घातला गेला त्याचेच अनुकरण फ्रान्स मधील रायफायझन व शुल्झे यानी केले व पुढे जगात विविध देशात सहकारी चळवळीची मुहर्तमेठ रोवली गेली भारतात ब्रिटिशांच्या पुढाकारातून म्हणजेच सावकारी पाशातून शेतकरी कष्टक—यासारखा गरिब, सामान्य माणुस मुक्त व्हावा याकरीता एकासाठी सर्व व सर्वासाठी एक या तत्वाने ग्रामीण समाजातील सर्व घटकाला सर्वागिण आर्थिक विकासासाठी सहकार चळवळ व सहकारी कायदे अस्तित्वात येवून 1904 मध्ये भारतात व 1960 महाराष्ट्रात सहकारी चळवळ सुरु झाली. वर्तमान काळात सहकारी चळवळीची जाणिव असल्याने 100 वर्षापेक्षा अधिक कार्यकाळात महाराष्ट्रात सहकार चळवळीची वाटचाल याचा परामर्श घेण्याचा अल्पसा प्रयत्न प्रस्तुत लेखात केला आहे.

***सहकाराची व्याख्या*** — सहकार ही विश्वव्यापी चळवळ असल्याने सहकाराच्या व्याख्या काही विचारवंताने केलेल्या आहेत. त्यातील काही व्याख्या खालीलप्रमाणे

1. स्ट्रिंकलॅण्ड यांच्या मते— " व्यक्तिनी स्वच्छेने एकत्र येवून आपल्या आर्थिक हित संबंधाच्या उन्नतीसाठी समतेच्या तत्वावर निर्माण केलेली संघटना म्हणजे सहकार होय."
2.वैकुंठभाई मेहता यांच्या मते —"एखाद्या समाजात शांततामय मार्गाने मुलभूत परिवर्तन घडवण्याचे प्रभावी शस्त्र म्हणजे सहकार चळवळ होय. "
थोडक्यात सहकार म्हणजे एकमेकांना मदत करून त्याद्वारे मानवी जीवन समृद्ध करणे होय. त्यामुळे सहकार ही सर्वाची सर्वाकरिता सर्वानी मिळून परस्पर सहकार्यातून लोकांनी आपल्यासाठी व समाजासाठी चालवलेली चळवळ आहे.

***सहकारी कायद्याचे कार्यक्षेत्र*** — महाराष्ट्रात सहकार चळवळीचा विचार करता या राज्यात लागू असलेल्या सहकारी कायद्याची माहिती पुढील प्रमाणे

**Title :** *महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या वाटचालीचे सिंहावलोकन*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850]** *चौधरी आर.एम.* **yr:2013 vol:2 iss:10**

1.सहकारी पतसंस्थाचा कायदा 1904 – संपुर्ण ब्रिटिश इंडियासाठी
2. सहकारी संस्थाचा कायदा 1912 – संपुर्ण ब्रिटिश इंडियासाठी
3.मुंबई सहकारी संस्थाचा कायदा 1925 – मुंबई राज्यासाठी
4.महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा 1960– महाराष्ट्रासाठी

***कायद्याची अंमलबजावणी*** –1904, 1912 व 1925 च्या कायद्यात अंमलबजावणी तारखेबाबत तरतुदी नव्हत्या परंतु महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा 1960 मध्ये शासन जाहिर करील त्या तारखेपासून कायद्याची अंमलबजावणी केली जाईल असा उल्लेख दिसून येतो या कायद्याला राष्ट्रपतीची मान्यता 04 मे 1961 ला मिळाली पुढे 09 मे 1941 च्या राजपत्रात तो प्रकाशित होउन महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार व अंमलबजावणीनुसार 26 जानेवारी 1962 पासून सुरु झाली.

सहकारी चळवळीची सुरूवात 1904 ला झाली असली तरी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 स्वतंत्रपणे संमत केले असून त्याची अंमलबजावणी महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा 1960 बरोबरच 26 जानेवारी 1962 पासून सुरु झाली त्यातही गेल्या अनेक वर्षात प्रामुख्याने 1986, 1990 व 1991 मध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत व आजही सुधारणेचे धोरण स्पष्ट दिसत आहे.

सहकाराची माध्यमे –सहकारी चळवळीने महाराष्ट्रात अनेक संस्थातून वाटचाल केलेली आहे ती पुढीलप्रमाणे

उत्पादक सहकारी संस्था : (Producer's Co- operatives)
सेवा सहकारी संस्था : (Agricultural Co- operatives)
सहकारी पतपुरवठा संस्था : (Credit Co- operatives)
शेतकरी सहकारी संस्था : (Farming Co- operatives)
खरेदी विक्रि सहकारी संस्था : (Marketing Co- operatives)
बहुउद्देशीय सहकारी संस्था : (Multi purpose Co- operatives)
ग्रहनिर्माण सहकारी संस्था : (Housing Co- operatives)
ग्राहक सहकारी संस्था : (Consumers Co- operatives)
नागरी व ग्रामीण सहकारी संस्था : (Urban & Rural finance Co-Operatives)

***महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास व वाटचाल :***

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सहकाराला नवी गती मिळाली विकासाने एक नवे युग सुरु झाले आहे राष्ट्रोद्धाराच्या कार्यक्रमातच सहकारी चळवळीला महत्त्वपूर्ण स्थान मिळाले पंचवार्षिक योजना व विविध धोरणातून राष्ट्रोद्धार हे धोरण देशाने अवलंबिले परकिय ब्रिटिश राजवटीत सहकारी चळवळीकडे पाहण्याचा शासनाचा दृष्टिकोन सहानूभूतीचा असला तरी स्वातंत्र्यानंतर व महाराष्ट्र स्थापनेनंतर राष्ट्राच्या उन्नतीचे माध्यम म्हणून सहकार चळवळ स्विकारली गेली व आर्थिक नियोजनात सहकाराला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले त्यातच देशाच्या सामाजिक आर्थिक प्रगतीसाठी लोकशाहीच्या चौकटीत समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचे धोरण आखण्यात आले व सहकारी चळवळीने समाज जीवनातील सर्वच आर्थिक क्षेत्रात प्रवेश केलेला आहे.

1960 नंतर महाराष्ट्रात सहकारी चळवळीद्वारे राबवलेल्या पंचवार्षिक योजनामुळे राज्याच्या ग्रामीण व नागरी भागात लक्षणीय आर्थिक प्रगती झालेली आहे यात संशय नाही त्यामुळेच आज महाराष्ट्रातील सहकारी चळवळ देशात अग्रेसर असून सहकारी संस्थाचा विस्तारलेला वटवृक्ष झाला आहे अलिकडील काळातील संस्थाची निराशाजनक वाटचाल वगळता या चळवळीने महाराष्ट्रात 100 वर्षात चांगले पाय रोवून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, प्रादेशिक, राजकिय, कृषि व औद्योगिक समाज उभा राहिला. सामान्य शेतक–याला सहकाराने विकास प्रक्रियेत सहभागी करून घेतले व आथिक परिवर्तनास हातभार लावून ग्रामीण भागात बदल घडवून एक नवे अर्थशास्त्र जन्मास घातले आहे.

महाराष्ट्रात सहकारी पतसंस्थाच्या व्याप्तीने समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत आपली पाळेमुळे पसरवून सहकाराची पायाभरणी केली आहे. 1960 ला महाराष्ट्र स्थापनेनंतर राज्यात 31565 संस्था होत्या. पण आज 2013 पर्यंत 2 लाख 40 हजार संस्था, 4 लाख कोटी रुपयांच्या ठेवी, 6 लाख कोटीची उलाढाल आणि 4.5 कोटी सभासदांचा पसारा निर्माण केला आहे. त्यामुळे महाराष्ट्र स्थापनेपासून ते आजपर्यंत सहकारी चळवळीनीं अनेक बर वाईट अनुभवातून मार्गकमन केले तरी सहकाराने राज्यात हरीतकांती, धवलकांती, कृषी औदयोगिक कांती घडवली आहे. व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यामुळे काळानुरुप ही चळवळ रुजली व या चळवळीत बदलही झालेले आहेत.

सन 1904 चा सहकारी कायदा व 1960 चा महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा यानी सहकारी चळवळीला चाकोरी बद्धता प्राप्त करुन दिली मात्र नंतर हळूहळू सहकारी चळवळ कायद्याच्या जोखंडाने आवळू लागली स्वातंत्र्य चळवळीत ज्या कार्यकर्त्यांने नेत्याने जी सहकारी फळी महाराष्ट्रात व देशात उभी केली व संस्थाची स्थापना केली

त्याचीच फळे आजच्या पिढीला चाखायला मिळत आहेत. व्यक्तीच्या अनेक गरजांच्या पूर्ततेसाठी सहकार चळवळ सुरु होवून सहकाराच्या क्षेत्राने समाज जीवन पूर्णपणे व्यापून टाकलेले आहे. त्यामुळे सहकारी चळवळीचा देशाच्या आर्थिक विकासामध्ये महत्त्वपूर्ण सहभाग असून देशाला व राष्ट्राला एक नवी दिशा प्राप्त झाली. राष्ट्रीय उत्पन्नात सहकाराने भर घालून मानवी जिवनाच्या व पर्यायाने देशाच्या विकासाचा स्तर उंचावू लागला त्यामुळे महाराष्ट्राची व देशाची सहकारी चळवळीची वाटचाल ही आधुनिक भारतातील नेत्रदिपक घटना होय. पण आता जागतिकिकरण, खाजगीकरण व उदारीकरणासारख्या मुक्त धोरणाचा परिणाम सर्वच क्षेत्रावर झालेला असून सहकार क्षेत्र देखिल त्याला अपवाद राहू शकत नाही. त्यामुळे आता या सहकारी चळवळीला धक्के बसायला लागले आहेत. सहकारावर आधारलेला सामान्य माणूस चिंतीत होवून या व्यवस्थेविरुद्ध सामान्य माणसात भ्रम निर्माण झाला आहे. जागतिक स्तरावर झालेल्या आर्थिक उलाठालीत सहकारी चळवळीच्या अस्तित्वालाच आव्हान निर्माण झाले आहे झपाट्याने वाढणा–या सुविधामुळे जग छोटे वाटू लागले आहे. लोकशाही, बंधुभाव, चारित्र्य, शांतता, समानता या अधिष्ठानावर महाराष्ट्रात सहकारी संस्थाने आपला आलेख व परिघ वाढवून आपली सिद्धता स्पष्ट केली आहे. पण महाराष्ट्रात संख्यात्मक विस्ताराबरोबर सहकारी संस्थाचा गुणात्मक स्तर वाढवण्याची जबाबदारी दुर्लक्षली गेली` सहकाराची वाटचाल ही सहकारापुरतीच मर्यादित न राहता सामान्य माणूस हा सहकारी चळवळीचा केंद्रबिंदू झाला पाहिजे व बिकट परिस्थितीत वाटचाल करणा–या आजच्या महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला व्यवसायिकतेतून गतवैभव मिळवून महाराष्ट्रात कालानुरुप विकासाची चळवळ सहकारी चळवळ झाली पाहिजे असेच सर्वसामान्य लोकांना वाटते हेच आता सहकाराबाबत महाराष्ट्रात सिद्ध करण्याची गरज आहे यासाठी सहकारी चळवळीने आपल्या भूमिकेचे अवलोकन करून भविष्यातील वाटचालीची दिशा ठरवण्यासाठी धडे घेणे आवश्यक झाले आहे.

*संदर्भ*

1.डॉ. बी. एस. माथूर, 'को ऑपरेशन इन इंडिया', साहित्य भवन आग्रा.2003
2.डॉ. धनंजयराव गाडगीळ, 'जन्मशताब्दी विशेषांक', प्रबोधन प्रकाशन इंचलकरंजी 2000
3.पाटील जे.एफ, कुलकर्णी, पी.बी. , 'सहकारातील आरिष्ट कारणे व उपाय' समाजवादी प्रबोधनी इचलकरंजी 1989.
4.प्रा. फाले.कृ.ल, डॉ. किशोर फाले, 'सहकारी चळवळ शतकसंग्रह', सहकार मुद्रनालय, पुणे 2004.
5.कुलकर्णी, पी.आर., 'सहकार तत्व आणि व्यवहार', पिंपळापुरे पब्लिकेशन नागपूर 1990.
6.मोरे शशांक, 'महाराष्ट्र सहकारी कायदा' 1960.
7.K. N. Naik, 'Co- operative Movement in bombay state', 1993.
8.Dr. Hough E.S., 'Co- operative Movement in India', 1960.
9.Co- operative Prespetive vikuanth mehata National ins pune 2000.
10.www. co- operative on net

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net